



Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे अंक : २८३ वा रविवार दि. १२ जानेवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# शिंदेंना महायुतीतून डच्चू मिळणार?

# फडणवीसांचं उद्धव ठाकरेंबाबत मोठं वक्तव्य...

वृत्तसंस्था/नागपूर

मागील काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात नवीन समीकरणं बघायला मिळू शकतात, अशा चर्चा आ-हेत. मुख्यमंत्रीपदावरून झालेली गच्छंती आणि त्यानंतर मंत्रीमंडळ विस्तारात मिळालेली कमी महत्वाची पदं पाहता, महायुती सरकारमध्ये एकनाथ शिंदे नाराज असल्याच्या चर्चा आहे.एकीकडे शिंदेंच्या नाराजीच्या चर्चा सुरू असताना भाजपचं ठाकरे गटासोबत सख्य वाढत असल्याची चर्चा आहे. दोनच दिवसांपूर्वी आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली होती. मुंबईतील विविध समस्या आणि विकासकामांच्या चर्चेसाठी ही भेट घेतल्याचं सांगण्यात आलं, मात्र त्यानंतर महापालिका निवडणुकीत ठाकरे आणि भाजप एकत्र येऊ शकतात, या चर्चांनी वेग पकडला आहे. तसेच महापालिका निवडणुकीत शिंदेंसोबत भाजप काडीमोड घेऊ शकतो, अशाही चर्चा आहेत. महापालिका निवडणुकीपूर्वी ठाकरे आणि भाजपमध्ये युती होऊ शकते, याबाबतचे संकेत स्वत: देवेंद्र फडणवीसांनी दिले आहेत. उद्धव ठाकरे आमचे शत्रू नाहीत, असं वक्तव्य फडणवीसांनी केलं आहे. तर ठाकरेंनी देखील उद्या काय होईल, हे सांगू शकत नाही, असं वक्तव्य केलं आहे. दोन्ही बाजुने सकारात्मक भूमिका घेतली जात असल्याने आगामी महापालिका निवडणुकीत ठाकरे आणि भाजप एकत्र येऊ शकतात, असं बोललं जातंय.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच नागपुरातील एका कार्यक्रमाला हजेरी ला-वली होती. या कार्यक्रमात फडणवीसांची मुलाखत घेण्यात आली. या मुलाखतीत राज ठाकरे की उद्धव ठाकरे असा प्रश्न विचारण्यात आला, यावर फडणवीसांनी सूचक प्रतिक्रिया दिली आहे. उद्धव ठाकरे आधी आमचे मित्र होते. आता राज ठाकरे आमचे मित्र आहेत. मात्र उद्धव ठाकरे आमचे शत्रू नाहीत, असं वक्तव्य फडणवीसांनी केलं आहे. फडणवीसांनी महापालिका निवडणुकीआधी नव्या युतीचे संकेत दिल्याचं सांगितलं जातंय.खरंतर, उद्धव ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीत आक्रमक भूमिका घेतली होती. एक तर तू राहशील किंवा मी राहीन, असं




आव्हान त्यांनी फडणवीसांना दिलं होतं. पण विधानसभा निकालानंतर उद्धव ठाकरेंनी मवाळ धोरण स्विकारलं आहे. काही दिवसांपूर्वी नागपुरात पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान ठाकरेंनी फडणवीसांची भेट घेतली होती. पुष्पगुच्छ देऊन त्यांचं अभिनंदन केलं होतं. यानंतर मागच्या काही दिवसांत उद्धव ठाकरे यांचे पुत्र आदित्य ठाकरे तीन वेळा फडणवीसांच्या भेटीला गेले आहेत. तसेच अलीकडे शिवसेना ठाकरे गटाचं मुखपत्र असलेल्या सामनामधून फडणवीसांवर स्तुतीसुमनं देखील उधळली होती. या सगळ्या घडामोडी पाहता, आगामी निवडणुकीत राज्यात नवीन समीकरण बघायला मिळू शकतं, अशी चर्चा आहे.

## कालव्याचा पाझर बळीराजांच्या डोळ्यातून झिरपतोय!

जनसंचलन/ देऊळगाव घुबे

तालुक्यातील भरोसा आणि वसंतनगर दरम्यान असलेल्या मुख्य कालव्याचे बांधकाम निकृष्टदर्जाचे झाल्यामुळे भरोसा आणि वसंतनगर येथील शेकडो हेक्टरवरील रब्बीचे पीक चिभडून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीचा पंचनामा करून शेतकऱ्यांना न्याय मिळावा म्हणून जय सेवालाल पाणी वापर संस्थेने उपविभागीय अधिकाऱ्याला निवेदन सादर केले आहे. भरोसा व वसंतनगर येथील शेतकऱ्यांच्या शेतामधून मुख्य शाखा कालवा उपसासिंचन योजना टप्पा क्रमांक ३ हा गेलेला आहे या कालव्याच्या सिमेंट कॉंक्रिटिकरन अत्यंत निकृष्ठ दर्जाचे करण्यात आलेले असल्यामुळे वसंतनगर येथील शेतकरी कडूबा रामभाऊ चव्हाण यांच्या शेतापासून भरोसा येथील नितीन तेजराव थुट्टे यांच्या शेतापर्यंत असलेल्या सर्वच शेतकऱ्यांच्या शेतात पाण्याचे उखळे ला-गले असल्याने शेतकरी हतबल झाले आहे. गेली पाच सहा वर्षांपासून पाटाद्वारे भरोसा ,अचंरवाडी,देऊळगावघुबे,रामन गर,मुरादपूर याभागात पाणी सोडण्यात येते प्रत्येक वेळी पाटाला पाणी आले की मुख्यकालव्याला उखळे लागून पाणी शेजारच्या शेतकऱ्यांच्या शेतात सुरू होते एकदा कालव्यामध्ये पाणी सुटले म्हणजे कालव्याला १० ते १२ दिवस पाणी सुरू असते त्या दरम्यान अति पाण्यामुळे शेता-तील पिके पिवळी पडून नुकसान होत आहे काही शेतकऱ्यांच्या शेतात तूरीचे पीक उभे असून सोगंणीला आलेली तूर पिकाला शेतात पाय फसतात म्हणून मजूर सोंगण्याला तयार नाही.दर वर्षी शेतकरी



प्रशासनाकडे तक्रारी देतात काहींना मदत दिली जाते तर काहींजण मदतीप-ासून वंचीत ठेवले जात आहे.या भागात पाटाला पाणी सुटले की काही शेतकरी आनंदी होतात तर काही शेतकरी नाराज होत असल्याचे चित्र आहे सदर शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना त्वरित मदत देण्यात येण्याची मागणी जय सेव-ालाल पाणीवापर संस्थेने आपल्या शेतकऱ्यांसाठी प्रशासनाकडे केली आहे.

## रोह्यांचे कळप करतात शेतमाल गळप!

जनसंचलन/देऊळगाव घुबे

तालुक्यातील देऊळगाव घुबे परिसरातील वन्य प्राण्यांने शेतकरीवर्ग त्रस्त झाला आहे. शेतपिकांवर झडप घालून वन्यप्राणि पिकांची नासाडी करीत असल्याने वन्यप्राण्यांच्या बंदोबस्ताची मागणी ऐरणीवर आली आहे. रात्री वन्य प्राणी रोही पिकांची नासाडी करून शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान करीत असल्याने वारंवार वन विभागाकडे तोंडी फोन द्वारे शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या तरी काही फरक पडत नाही.मग हातातोंडाशी आलेला घास जर वन्य प्राणी हिसकून घेत असेल तर मग शेतकऱ्यांनी जगावे कसे?



हजारो रुपये खर्च करून महागडे बियाणे, खते खरेदी केले व काही शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेतीसाठी बियाणे, खते, औषधी खरेदी केली व शेतकऱ्यांनी पेरणी केली.आता अंकुर जमिनीतून बाहेर निघाले असून, अंकुर पिकांची वाढ होत असताना व काही पिके काढायला सुरवात झाली आहे,वन्य प्राणी शेतकऱ्यांच्या पिकांची नासाडी करीत आहेत.

# ..आजची युवा पिढी व सद्यस्थिती..

**जगातील सर्वात तरुण जन देश जर कोणता असेल तर तो आपला भारत देश आहे. आज आपल्या देशाची लोकसंख्या १४४ कोटी इतकी आहे. आपल्या देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ६० टक्के लोकसंख्या ही १८ ते ४० या वयोगटातील आहे. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. देशाचे भविष्य याच तरुणांवर अवलंबून आहे. याच तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. माजी राष्ट्रपती ए पी जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. तरुणच आपल्या देशाचे भाग्यविधाते आहेत असे ते म्हणत.**

या तरुणांकडे असलेल्या ऊर्जेचा उपयोग देशकार्यासाठी करुन घ्यावा असे त्यांचे मत होते. पण आज तरुणांसमोर अनेक आव्हाने आहेत. सर्वात मोठे आव्हान आहे ते बेरोजगारीचे. आजचे तरुण उच्चविद्याविभूषित आहेत. हुशार आहेत. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रीडा, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात आजचे तरुण अग्रेसर आहेत. देशासाठी काहीतरी करुन दाखवण्याची जिद्द त्यांच्याकडे आहे. शिक्षण आणि काम करण्याची उर्मी असूनही त्यांच्या हाताला रोजगार नाही. पदव्यांचे भेंडोळे घेऊन तरुण जागोजागी फिरत आहेत मात्र त्यांना नोकरी मिळत नाही. सरकारी नोकर भरती बंद आहे. खाजगी क्षेत्रात नोकरी मिळत नाही. ज्यांना आहे त्यांना नोकरी टिकवणे मुश्किल झाले आहे. स्वतःचा व्यवसाय, उद्योग करायचा म्हटले तर भांडवल नाही. शेतीही बेभरवशाची झाली आहे त्यामुळे आजचे तरुण हताश झाले आहेत. या हताश तरुणांना धीर देऊन त्यांना रोजगार देण्याऐवजी राजकीय नेते त्यांना पकोडे विका असे म्हणून त्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहेत. रोजगार नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड निराशा पसरली आहे. नैराश्यातून काही तरुणांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी गेले आहेत. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहोत तोच तरुण रोजगार नसल्याने आपले जीवन अकाली संपवत आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी जात आहेत हे पाहून मन खिन्न होते. रोजगार मिळत नसल्याने तरुणांच्या मनात व्यवस्थेविरुद्ध सुप्त असंतोष आहे. या असंतोषाचा भडका होण्याआधीच सरकारने तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी ठोस धोरण आखावे. जर या तरुणांच्या मनातील असंतोषाचा भडका झाला तर भल्याभल्यांना पळता भुई थोडी होईल. सध्याच्या बेरोजगारीचा दर हा मागील ४५ वर्षातील सर्वात जास्त आहे ही बाब आपल्या देशाला भूषणावह नाही. हा दर कमी करण्यासाठी आणि तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी सरकार काही ठोस प्रयत्नही करताना दिसत नाही. या तरुणाईचा वापर केवळ मते मिळवण्यासाठीच केला जात आहे असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल. तरुणांच्या हाताला काम मिळणे ही काळाची गरज आहे कारण तरुणांच्या हाताला काम मिळाले नाही तर तरुणाई भरकटण्याची शक्यता अधिक आहे. त्यांच्या शिक्षणाचा, त्यांच्यातील ऊर्जेचा समाजाला, देशाला उपयोग होण्याऐवजी ती ऊर्जा वाया जाण्याचीच शक्यता अधिक आहे. या तरुणांच्या शिक्षणाचा व ऊर्जेचा देशकार्यासाठी उपयोग व्हायला हवा. त्यांचा उपयोग जर देशकार्यासाठी झाला तर आपल्याला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. आजची तरुणाई हीच आपली शक्ती आहे. या शक्तीचा वापर व्हायला हवा. जगात सर्वात जास्त तरुण भारतात आहे. जगात चिनंतर सर्वात जास्त लोकसंख्या भारतात आहे. खरंतर याला समस्या न मानता संधी मानली पाहिजे. या संधीचे सोने करुन तरुणांच्या हाताला रोजगार दिल्यास भारत महासत्ता बनेल यात शंका नाही. आजच्या तरुणांना जग सुंदर शांत असावे असे वाटते. गरिबी, भ्रष्टाचार त्यांना नको आहे. प्रजासत्ताक राष्ट्रावर त्यांची निष्ठा आहे. आपण समोरच्याला समजून न घेता त्याचा दुस्वास कसा करू शकतो? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचे ते सतत प्रयत्न करीत असतात. त्यांना एक स्थिर व सुरक्षित अर्थव्यवस्था हवी आहे. आपल्या आजूबाजूच्या परिसराबाबत ते तितकेच जागृत असतात.संपत्ती कधीतरी संपून जाईल त्यामुळे तिचा जपून वापर करण्यास ते प्राधान्य देतात. थोडक्यात सांगायचे तर आजचा तरुण जबाबदार आहे. तो आपल्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहत आहे. याचवेळी पैशापेक्षा आनंद महत्वाचा असल्यामुळे तो आपल्या आवडीनुसार करियर निवडण्यास प्राधान्य देतोय त्यामुळे आपण जे काही काम करीत आहे त्यासाठी लोकांनी आपल्याकडे मानाने पहावे अशी त्यांची इच्छा आहे. आपल्या देशातील ६९ टक्के तरुणांना ठाम विश्वास आहे की पैसे त्यांच्यासाठी आनंद विकत आणू शकत नाही तर ८० टक्के तरुणांना पैशापेक्षा कला, ७९ टक्के तरुणांना पैशापेक्षा शिक्षण आणि ७६ टक्के तरुणांना पैशापेक्षा यश महत्वाचे वाटते.

लेखक
**श्याम बसप्पा**

# म्हाडा कॉलनीत दिसला बिबट्या नागरिकांमध्ये भीती !


जनसंचलन/बुलढाणा



अजिंठा डोंगराला लागून असलेल्या शहरातील म्हाडा कॉलनीत शुक्रवारी (दि. १०) अचानक बिबट्या दिसून आला. त्यामुळे अनेकांची घाबरगुंडी उडाली होती. बिबट्या आजारी असल्याचे किंवा त्याला काही त्रास होत असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. बुलढाणा शहराचा विस्तार झाला असून, वायव्य दिशेला अगदी अजिंठा डोंगराच्या काठापर्यंत वस्ती गेली आहे. या भागात म्हाडाची कॉलनी आहे. जंगलाला लागूनच हा भाग आहे. त्यामुळे या भागात बऱ्याचदा वन्यप्राणी आले आहेत. बिबट्याने एकदा कॉलनीमधील एका घारासमोरून कुत्र्याची शिकार केली होती. या भागात बिबट, अस्वलाचा वावर वाढला आहे. शुक्रवारी सकाळी ७ वाजताच्या सुमारास या भागात पुन्हा एका बिबट्याने प्रवेश केल्याचे मॉर्निंग वॉक करणाऱ्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे सर्वांची घाबरगुंडी उडाली. याची माहिती परिसरात पोहोचताच नागरिकांनी बिबट्याला पहाण्यासाठी गर्दी केली होती. काही नागरिकांनी बिबट्याला आपल्या कॅमेऱ्यात कैद केले आहे. बिबट्या आजारी असल्याचे किंवा त्याला दुखापतीमुळे त्रास होत असल्याचे दिसत होते. रेस्कू पथक पोहोचेपर्यंत बिबट्या दरीत निघून गेला. सध्या बिबट्याचा शोध सुरू आहे.

# आर्थिक कारणावरून विवाहितेचा छळ

जनसंचलन/मोताळा




माहेराहून पैसे आणावे, या कारणासाठी २५ वर्षीय विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी बोराखेडी पोलिसांनी मध्य प्रदेशातील नेपानगर येथील दोन जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. नांदुरा तालुक्यातील खैरा येथील किरण पवन साबे (२५) विवाहितेने बोराखेडी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार, बऱ्हाणपूर जिल्ह्यातील नेपानगर येथील शास्त्रीनगर येथे राहत असलेले पवन राजू साबे, मीनाबाई राजू साबे या दोघांनी माहेरून पैसे आणण्याच्या कारणावरून शारीरिक व मानसिक छळ केला, तसेच कामधंदा येत नसल्याने राहू नको, असे म्हणत त्रास दिल्याचा आरोप तक्रारीत केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी पवन साबे, मीनाबाई साबे या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. १० जानेवारीपूर्वी ही घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिस हेडकॉन्स्टेबल सुपडासिंग चव्हाण आणि पोलिस कॉन्स्टेबल सुपडासिंग चव्हाण, सदानंद हाडे हे करीत आहेत.

# शिवशाहीला अपघात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल...

जनसंचलन/ खामगाव

अज्ञात चालकाने ट्रॅक्टर आडवा लावल्याने शिवशाही बसचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून ती रस्त्याखाली घसरल्याची घटना दि. ८ जानेवारी रोजी घडली. अपघातात बसचालक, वाहकासह १७ जण जखमी झाले. या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी अज्ञात ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. संभाजीनगर (सिडको) येथील भारत रोहिदास कादे (वय ४३) हे ताब्यातील शिवशाही बस (एमएच-०९ ईव्ही ९९७३) मधून संभाजीनगर येथून अकोलाकडे प्रवासी घेऊन जात होते.



# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार २६ जानेवारीपर्यंत ऑनलाईन अर्ज आमंत्रित

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाद्वारे राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटुंना व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना क्रीडा विभागाचा प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या पुरस्कारासाठी इच्छुकांनी दि. २६ जानेवारी २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी केले आहे. क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ क्रीडा महर्षिंकरीता जीवन गौरव पुरस्कार, क्रीडा मार्गदर्शकांकरीता उत्कृष्ठ क्रीडा मार्गदर्शक, जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (माहिला क्रीडा मार्गदर्शक), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) असे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. शासन निर्णय दि.२९ डिसेंबर २०२३ व दि. २५ जानेवारी २०२४ नुसार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सुधारीत नियमावली-२०२३ विहीत केली आहे. या नियमावलीनुसार सन २०२३-२४ या वर्षाच्या पुरस्कारासाठी क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू साहसी उपक्रम व दिव्यांग खेळाडू यांनी विहीत मुदतीत क्रीडा विभागाच्या :https://sports.maharashtra.gov.in संकेतस्थळावर अर्ज करावा. ही लिंक दि.१४ जानेवारी ते २६ जानेवारी २०२५ या कालावधीपर्यंत सुरु राहिल. तसेच अर्ज स्वीकारण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे कार्यालय कार्यालयीन वेळेत सुट्टीच्या दिवशी देखील सुरु ठेवण्यात येत आहे.

# पथनाट्यातून बालविवाह मुक्तीचा संदेश

जनसंचलन/ देऊळगाव राजा



समर्थ कृषी महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकांनी खल्याळगव्हाण येथे पथनाट्यातून बालविवाह मुक्तीचा संदेश दिला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी स्वच्छता रॅली, श्रमदान केल्यानंतर पथनाट्य सादर केले. स्वच्छता रॅलीमध्ये रासेयो स्वयंसेवकांनी गावातील चौक, मंदिर तसेच ग्रामपंचायत येथे स्वच्छता अभियान राबविले. पथनाट्यामध्ये बालविवाहाचे दुष्परिणाम आणि त्याचे कायदेशीर परिणाम यांची माहिती देण्यात आली. त्याचबरोबर आम्ही बाल विवाह करणार नाही आणि होऊ देणार नाही याविषयी शपथ घेतली. पथनाट्यांमधून बालविवाहमुक्त भारत या विषयावर रासेयो स्वयंसेवकांनी कमी वयात मुला-मुलींचे लग्न दिला. न करण्याचा संदेश रासेयोचे स्वयंसेवक अक्षय जाधव, ऋषिकेश राऊत, रोहन ताटे, धनंजय मनेरी, राम उबाळे, आनंद बारगल, सुहास चव्हाण, नेहा लहाने, अंजली खिरडे, पल्लवी डवरे व साक्षी बुंदे यांनी यावेळी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. किरण ठाकरे, प्रा. विलास सातपुते, प्रा. विकास म्हस्के, प्रा. सोनाली इंगळे, स्वयंसेवक, उपस्थित होते. स्थानिक नागरिक

# एफ.एस.एस.ए.आयचा उपक्रम खाद्य पदार्थ विक्रेत्यांसाठी एक दिवशीय प्रशिक्षण

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची प्रमुख उपस्थिती

जनसंचलन/बुलढाणा

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण(एफएसएसएआय) पश्चिम क्षेत्रमार्फत इ्संकल्प स्वच्छ आहारफ्ठपक्रमांतर्गत रविवार दि. १२ जानेवारी २०२५ रोजी बुलढाणा येथील सहकार विद्या मंदिर शाळेत रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांसाठी प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणात २००० पेक्षा जास्त विक्रेते सहभागी होणार असून विषय तज्ज्ञाव्दारे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणाचे खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणचे सहायक संचालक ज्योती हरणे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिजाऊ सभागृहात इ्संकल्प स्वच्छ आहारफ्ठपक्रमांतर्गत खाद्य विक्रेत्यांसाठी प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण पश्चिम क्षेत्राचे सहायक संचालक अजय खैरनार, निलेश धंदाळे, शुभांगी निकम तसेच पत्रकार बांधव उपस्थित होते. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अन्न सुरक्षा प्रशिक्षण आणि प्रमाणीकरण कार्यक्रमात रस्त्यावर खाद्यपदार्थ विकणारे २००० पेक्षा जास्त विक्रेते सहभागी होणार आहेत. हा कार्यक्रम केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण आणि रसायने आणि खते मंत्री यांनी २०२३ च्या जागतिक अन्न सुरक्षा दिनी केलेल्या घोषणेला अनुसरून आहे. ज्यामध्ये २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या अखेरीस अन्न हाताळणी करणाऱ्या २.५ दशलक्ष जणांना प्रशिक्षण देण्याचे काम एफएसएसआयला देण्यात आले आहे. एफएसएसआयचा फोस्टॅक() कार्यक्रमांतर्गत अन्न हाताळणाऱ्यांना, ज्यामध्ये रस्त्यावरील विक्रेत्यांना अन्न सुरक्षा आणि स्वच्छता मानके राखण्यासाठी आवश्यक असलेले महत्त्वाचे ज्ञान आणि कौशल्ये प्रदान करण्यासाठी तयार केला गेला आहे. या प्रशिक्षणात वैयक्तिक स्वच्छता, सुरक्षित अन्न हाताळणी आणि अन्नपदार्थ दूषित होण्यास प्रतिबंध यासारख्या प्रमुख क्षेत्रांचा समावेश आहे. विक्रेत्यांना नियामक अनुपालन आणि अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी करावयाचे उपाययोजनाची माहिती यावेळी दिली जाणार आहे. रस्त्यावरील खाद्यपदार्थ हे भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे एक जिवंत उदाहरण आहे, जे देशाच्या विविध पाककृती परंपरा, विशिष्ट चव आणि सामाजिक परिदृश्याचे दर्शन घडवते. त्याच्या वाढत्या लोकप्रियतेसह, ग्राहकांसाठी त्याची सुरक्षितता सुनिश्चित करणे आणि त्याचबरोबर रस्त्यावरील या आवडत्या पदार्थांची निर्मिती करणाऱ्या विक्रेत्यांना पाठबळ देणे देखील महत्त्वाचे आहे.

# राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्स जिजाऊ गाथा महोत्सवाचे थाटात उद्घाटन

जनसंचलन/बुलढाणा

राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त जिजाऊ गाथा महोत्सवाचे आयोजन श्री. लखुजीराजे जाधव राजवाडा(राजमाता जिजाऊ जन्मस्थळ) येथे करण्यात आले. या महोत्सवाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते शुक्रवारी सायंकाळी झाले. सांस्कृतिक कार्य विभागामार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, व नगरपालिका प्रशासन यांच्या सहकार्याने दोन दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी आमदार मनोज कायदे, माजी आमदार तोताराम कायंदे, अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपविभागीय अधिकारी संजय खडसे, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम, तहसीलदार अजित दिवटे, मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे सहाय्यक संचालक संदीप शेंडे, माजी नगराध्यक्ष श्री. ठाकरे, माजी सभापती शिवाजी राजे जाधव माजी नगराध्यक्ष विष्णू भाऊ मेहत्रे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी व १०० कलाकारांचा समूहाव्दारे इ्जिजाऊ वंदना महाराष्ट्राची लोकधाराफ या ऐतिहासिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी डोळ्याचे पारणे फेडणाऱ्या या सोहळ्याने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहायक संचालक संदीप शेंडे यांनी केले.







# सहकार विद्यामंदिरमध्ये स्नेहसंमेलन उत्साहात

**जनसंचलन/ डोणगाव**

येथील सहकार विद्यामंदिरमध्ये दि. ८, ९ जानेवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. स्नेहबंध शैक्षणिक प्रगती सोबतच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बुलढाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटी बुलढाणा द्वारा संचालित इंदिराबाई माधव सावजी सहकार विद्यामंदिर डोणगाव येथे दरवर्षीप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये कला व क्रीडा गुण विकसित करण्यासाठी विविध प्रकारचे सांस्कृतिक व क्रीडा विषयक कार्यक्रम साजरे केले जातात. ८ जानेवारी रोजी लेझीम पथक व स्काऊट गाईडच्या पथसंचालनाने प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. स्थानिक सल्लागार समितीचे सचिव जीवनसिंग दिनोरे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन झाले. यावेळी स्थानिक सल्लागार समितीच्या अध्यक्षा रुपाताई रमेश सावजी, उपाध्यक्ष दिलीप कळसकर, सदस्य सुभाष सावजी, विजय काळे, हितेश सदावर्ते, पूर्वा ताई सदावर्ते, डोणगाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार अमरनाथ नागरे, केंद्र प्रमुख प्रमोद रायमुलकर, बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे विभाग प्रमुख शिरसाठ, बुलढाणा अर्बन डोणगावचे शाखाप्रमुख वाहेकर, मुख्याध्यापक सुनील गाढे उपमुख्याध्यापक नखोत आदी मान्यवर उपस्थित होते. नर्सरी ते इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे नृत्य संगीत नाटिका, ऐतिहासिक देखावे अशा विविधतेने नटलेल्या बहारदार कार्यक्रमाचे सादरीकरण केले.

# जिजाऊ माँ साहेबांना अभिवादन करण्यासाठी अवघे या!

## पत्रकार भवन येथे कार्यक्रम शहर पत्रकार संघाचा पुढाकार...



जिजाऊ माँ साहेबांना अभिवादन करण्यासाठी अवघे या! उद्या पत्रकार भवन येथे कार्यक्रम शहर पत्रकार संघाचा पुढाकार...

**जनसंचलन/बुलढाणा**

स्वराज्य संकल्पक राजमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या जयंतीनिमित्त बुलढाणा येथील पत्रकार भवनात अभिवादन माँ साहेबांना या कार्यक्रमाचे आयोजन उद्या १२ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी पत्रकार तथा तमाम नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन शहर पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे. जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. माँ साहेब जिजाऊ यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्यासाठी डॉ. वैशाली निकम यांचे व्याख्यान होणार असून, कार्यक्रमासाठी बुलढाणा शहर ठाणेदार नरेंद्र ठाकरे, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे माजी अध्यक्ष डॉ. शोन चिंचोले, दैनिक महाभुमिचे कार्यकारी संपादक ब्रह्मानंद जाधव, अजिंक्य भारतचे पत्रकार गणेश निकम यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमासाठी सर्व जिजाऊ प्रेमींनी उपस्थित रहावे, असे आवाहन शहर पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केस गळती बाधीत गावांना दिल्या भेटी...

## संशोधनासाठी आय सी एम आर शास्त्रज्ञांची टीम येणार असल्याची दिली माहिती...

**जनसंचलन/शेगाव**

केस गळती हा आजार कशामुळे झालाय हे शोधण्यासाठी दिल्ली चेन्नई येथून विशेष तज्ञ डॉक्टरांची टिम बोलवण्यात आली आहे आयुर्वेद युनानी होमिओपॅथी ऍलोपॅथीचे तज्ञ डॉक्टर्स आणि आय सी एम आर चे शास्त्रज्ञ या विचित्र केस गळती आजारावरचे संशोधन करीत आहे नागरिकांनी घाबरून नये असे आवाहन केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले

बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील अकरा गावामध्ये नागरीकांचे केस गळती होऊन टक्कल पडत असल्याची समस्या निर्माण झाली आहे आज ११ जानेवारी रोजी केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार), आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केस गळती बाधीत गावांना भेटी दिल्या रुग्णांसोबत संवाद सांघला आणि आजाराविषयी जाणून घेतले . हा आजार पहिल्यांदाच उद्भवला असल्याने आजाराच्या मुळाशी जावुन संशोधन करणे गरजे आहे दृष्टिकोनातून केंद्र आणि सरकारच्या आरोग्य विभागातर्फे उपाय योजना सुरु आहे . घरघुती वापरातील तेल साबण शाम्पू या उत्पादनांची तपासणी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे नागरिकांनीही या उत्पादनांची मुदत बाह्य झाली आहे का याचीही तपासणी करून ते वापरण्याचे आवाहन त्यांनी केले



केस गळती होत असलेल्याच्या घटनांची वेळीच दखल घेऊन मी तुम्हाला भेटण्यासाठी आणि धीर देण्यासाठी आलो आहे असुन केंद्र आणि राज्य सरकारचे आरोग्य विभाग २४ तास तुमच्या सेवेत राहणार आहेत असेही केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी ग्रामस्थांना सांगितले यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ भागवत भुसारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अमोल गीते उपस्थित होते

# म्हैसवाडी शिवारात रेती माफियांवर कारवाई



**जनसंचलन/ नरवेल**

पूर्णा नदीमध्ये वाळूचा अवैध उपसा करणाऱ्या माफियांवर महसूल विभागाच्या पथकाने धाड टाकून ट्रॅक्टरसह रेती उपसा यंत्र जप्त केले. ही कारवाई तहसीलदार राहुल तायडे यांच्या मार्गदर्शनात म्हैसवाडी, कोरवाड चिंचोल शिवारात गुरुवारी रात्री करण्यात आली. रेती माफियांच्या विरोधात मलकापूर महसूल विभाग ॲक्शन मोडवर आला आहे. पूर्णा नदी पात्रात वाळूचा अवैध उपसा करणाऱ्यांवर दररोज कारवाई केली जात आहे. जमनापुरी शिवारातील गट नंबर ३३३ मध्ये कारवाई करण्यात आली. त्यानंतर गुरुवारी रात्री म्हैसवाडी शिवारात कारवाई केली. यामध्ये ट्रॅक्टर, रेती उपसा करणारे यंत्र जप्त केले असून, तहसील कार्यालयात जमा करण्यात आले. ही कारवाई नायब तहसीलदार चव्हाण, तलाठी कौशल महाजन, म्हैसवाडी पोलिस पाटील योगेश पाटील, चिंचोल येथील पोलिस पाटील सिद्धार्थ कळाशे, चालक दिलीप तायडे यांनी केली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958